# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादाविषयीचे विचार

**प्रा.डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे**
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जिल्हा .नांदेड (महाराष्ट्र )

**प्रस्तावना :**

संविधान जागर समिती देगलूरच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने ऑनलाईन फेसबुक पेजवरून डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे राष्ट्रवादाविषयीचे विचार या विषयावर व्याख्यान देण्यासाठी मला संधी दिली त्याबद्दल आयोजकांचे आभार. या व्याख्यानाच्या निमित्ताने मी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवादाच्या विचाराचा जो आढावा घेतला त्यास या ठिकाणी लेख बद्ध करत आहे. प्रथमतः महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाहीवादी विचार ,आचार व कृतीला विनम्र अभिवादन .

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झालाहोता. त्याकाळात राष्ट्रवादा बाबत कांही प्रचलित विचारधारा होत्या . ज्यामध्ये महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू प्रणीत अहिंसावादी राष्ट्रवाद , साम्यवादी विचारधाराप्रणीत राष्ट्रवाद ,भगतसिंग ,राजगुरू ,सुखदेव प्रणीत क्रांतिकारी राष्ट्रवाद , डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रणीत राष्ट्रवाद इत्यादी . या सर्व राष्ट्रवादी विचारधारांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सक्रीय सहभाग होता ,हे एक यातील प्रमुख साम्य होते. याशिवाय या काळात आणखी एक जनसंघ रुपी राष्ट्रवादी विचारधारा अस्तित्वात होती. जिचे कॉंग्रेसच्या अंतर्गत राहून स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग होता.

आजच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रवादाच्या विचारधारेचे प्रस्थ आहे. जगातील प्रमुख देशात राष्ट्रवादाच्या विचारधारेने प्रभावित नेतृत्व तेथील सरकारच्या प्रमुख स्थानी आहे.या नेतृत्वाने त्यांच्या त्यांच्या देशात राष्ट्रवादाच्या नावाने सत्ता प्राप्त केली व त्यासाठी सर्व सामान्य जनतेत राष्ट्रवादाची भावना प्रखर करण्यास अधिक प्राधान्य दिले . विशेषता भारतात त्यास पूरक धोरण ,घटना व घोषणाना ईतर धोरनांच्या तुलनेत अधिक प्राधान्य दिले. आज राष्ट्रवादाबाबत देशातील सर्वच विद्यापीठ

,महाविद्यालय आणि मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात चर्चा होत आहे. आपण सर्वचजण याचर्चेचे भागीदारी बनत आहोत.

सध्या संपूर्ण जगात कोविड-१९ या महामारीने उन्माद माजवला आहे. अश्या वातावरणात आपण सर्वचजण महापुरुषांच्या विचाराचा जागर आपापल्या घरात राहूनच समाजापर्यंत पोहचवत आहोत. प्रस्तुत व्याख्यान व लेख त्याचाच एक भाग आहे. राष्ट्रवादाची विचारधारा जनमानसात आजच्या वातावरणात निर्माण करणे काळाची गरज आहे.

**लेखाचा उद्देश :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवादी विचारांवर प्रस्तुत लेख लिहिण्या मागचा उदेश या लेखाच्या प्रारंभीच प्रस्तुत करणे लेखकाला आवश्यक वाटते .प्रस्तुत लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवादी विचारांना जाणून घेण्याच्या हेतूने लिहला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संपूर्ण विचारात कुठेही एकत्रित स्वरुपात त्यांचे राष्ट्रवादाविषयीचे विचार आढळत नाहीत,ते अनेक विचारात विखुरलेले आहेत. त्यांना एकत्रित स्वरुपात मांडणे हा या लेखाचा उद्देश आहे. तसेच आजच्या कोविड - १९ महामारीच्या विळख्यातून भारतीय समाज व व्यक्तीला बाहेर काढण्यासाठीचे सुतोवाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्त्वादातून मिळतील का ? ते पाहण्यासाठी हा लेख लिहला आहे. तसेच त्यांची राष्ट्र व राष्ट्रवाद हि संकल्पना समजून घेण्याच्या हेतूनेही हा लेख लिहला आहे .

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचे आधार :**

वर सांगितल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवादाविषयीचे विचार त्यांच्या लेखनात एकत्रित स्वरुपात आढळत नाहीत. परंतु त्यांच्या जीवन चरित्रातील कांही घटना , प्रतिज्ञा व ग्रंथातून ते स्पष्टपणे अभिव्यक्त होतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण व्यक्तिमत्व भारतीय जीवन मुल्ये व समतावादी विचार धारेला मानणारे होते .त्याच्याप्रती त्यांच्या मनात प्रंचड आदर व श्रद्धा होती. मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही हि प्रतिज्ञा व त्यासाठी त्यांनी भारतीय मुशीत उभा राहिलेला व वाढलेला बौद्ध धर्म स्वीकारण्याची कृती. मी प्रथम भारतीय आहे .शेवटी हि भारतीय आहे आणि भारतीय असल्याखेरीज अन्य कोणीहि नाही हे त्यांचे विधान ते राष्ट्रवादी असल्याचे प्रतिक आहे. याशिवाय गोलमेज परिषदेतील त्यांचा सहभाग , पुणे करार ,भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य,ब्रिटीश मंत्रिमंडळातील मजूर मंत्री व बांधकाम मंत्री म्हणून त्यांनी केलेले काम , परराष्ट्र धोरणाबाबत भूमिका इत्यादीचा आधार घेऊन विस्ताराने त्याचे विश्लेषण करून हा लेख लिहला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादाविषयीचे विचार त्यांच्या थाटस ऑन पाकिस्तान ,स्टेट्स अंड मायनॉरिटीज ,अनिहीलेशन ऑफ कास्ट आणि रानडे , गांधी आणि जिना या ग्रंथातून व्यक्त होतात .

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र व राष्ट्रीयताविषयीचे विचार :**

राष्ट्र व राष्ट्रीयता या सामाजिक शास्त्रातील व समाजाच्या जीवनातील महत्वाच्या संकल्पना आहेत .या बाबत अनेक भारतीय व पाश्चिमात्य विचारवंतांनी अनेक लिखाण केले आहे.त्या बाबत विचारही मांडले आहेत . प्रस्तुत लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्र व राष्ट्रीयता यावर प्रकाश टाकणारा असल्यामुळे या ठिकाणी त्यांच्याच विचारांचा उल्लेख केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते राष्ट्र हि एक जिवंत आत्मा आहे. त्यासाठी समाजात सांस्कृतिक एकता महत्वाची आहे. जमीन ,समाज व समाजच्या श्रेष्ठ परंपरा यांची राष्ट्र निर्मितीसाठी आवश्यकता आहे. राष्ट्र निर्मितीसाठी तेथील समाजाचे राष्ट्रा संबंधीच्या सुख व दुख , यश -अपयश याबाबत सारखेच विचार असावेत .राष्ट्राच्या भूतकाळ व वर्त्मानाप्रती सर्वांचा समान दृष्टीकोन असावा .त्यांच्या मते राष्ट्र म्हणजे भातृत्वाच्या प्रखर जाणीवेने परस्पर बद्ध झालेला लोकसमुदाय होय .एकता व एकात्मतेच्या संयुक्त भावनेचा आभास हि राष्ट्रीयता आहे. राष्ट्र आणि राष्ट्रीयतेसाठी व्यक्ती व समाजाने आपले संप्रदाय , भाषा ,क्षेत्र ,जाती आदिल राष्ट्रापेक्षा श्रेष्ठ माणू नये .भारतीयत्वाची निष्ठाच सर्वश्रेष्ठ आहे , हिच निष्ठा तेव्हा व आजच्या कोविड -१९ या महाम्रीच्या काळात गरजेची आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्तिगत सुख व समृद्धीला ,ऐश्वर्याला तिलांजली देऊन संपूर्ण जीवनभर एक चिरंजीवी राष्ट्राच्या निर्मितीला आपले ध्येय मानले .भारतीय लोकात त्यांनी आय ऐवजी वूई ची भाषा व भाव रुजवला . त्यांच्या मते राष्ट्र निर्मितीसाठी मी ऐवजी आम्ही हि भावना व्यक्तीच्या मनात व आचरणात रुजणे आवश्यक आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादाविषयीचे विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण जीवनभर सर्वच क्षेत्रात भारताला एक संघ आणि एक समर्थ राष्ट्र करण्यासाठी त्यांनी मांडलेले विचार आजही आदर्शवत आहेत .व्यक्ती स्वातंत्र्यावर आधारलेली आणि सर्व्समाजाला देशाच्या निर्णय प्रक्रियेत सामावून घेणारी आधुनिक लोकशाही हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचे अधिष्ठान आहे. त्यामुळेच आपल्या सर्वांना समान रुपात भारतीय संविधानातून अधिकार व समान संधी मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद लोकशाहीधिष्टीत व धर्मनिरपेक्ष स्वरूपाचा होता .लोकशाही निर्णय प्रक्रियेत बहुसंख्याकांना राज्य करण्याचा अधिकार असला तरी अल्पसंख्याकांची गळचेपी होणार नाही अशी व्यवस्था असावी .सरकारच्या धोरणावर टीका अथवा त्याला विरोध करणे हा प्रत्येकाचा लोकशाहीतील अधिकार आहे. त्यामुळे लोकशाही सुदृढ होते .सरकारवर टीका म्हणजे राष्ट्र द्रोह नव्हे ,जे आज समजले जाते व विरोधकांना वागवले जाते . लोकशाहीधिष्टीत राष्ट्रवाद यशस्वी करण्यासाठी समता , बंधुता ,न्याय प्रस्थापित करणे अनिवार्य आहे.म्हणजेच

समजत सामाजिक नितीमत्ता असावी .विषमता नसावी.शोषण नसावे. वर्तमान समाजातील हिंदू राष्ट्रव हिंदू राष्ट्रवादाची विचारधारा त्यांना निरर्थक वाटत होती. लोकशाहीधिष्टीत राष्ट्रवादाच्या आड येणाऱ्या व्यक्तीपूजा ,विषमता ,शोषण ,अस्पृश्यता ,गुलामगिरी , मनुस्मृतीचे दहन ,अमानवीय प्रथा परंपराना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नाकारले .सामाजिक - आर्थिक - राजकीय व सांस्कृतिक समताधिष्टीत राष्ट्रवाद डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. विविधतापूर्ण देशाला एकतेच्या सूत्रात गुंफणारे संविधान राष्ट्राला समर्पित केले. तसेच हे संविधान भारताच्या अखंडत्वाला ,ऐक्याला, संरक्षणाला,स्वातंत्र्याला,जनहिताला,सार्वभौमत्वाला प्राधान्य ,संरक्षण व महत्व देणारे आहे.

आपल्या पीएच.डी.,डी.एस्सी चय प्रबंधातून इंग्रजी राजवट व्यापाराच्या निमित्ताने भारताचे आर्थिक शोषण कसे करत आहे,हे सांगून ब्रिटीश साम्राज्यवादाला विरोध केला.हिंदू समाज सलग आणि संघटीत करावयाचा असेल त्र विषमतेला आधार असणाऱ्या बाबी त्याज्य व तिरस्कृत केल्या पाहिजे .गोलमेज परिषदेत त्यांनी ब्रिटीशांनी भारताला लवकरात लवकर स्वराज्य द्यावे , या स्वराज्याची प्रांतिक व केंद्रीय सत्ता भारतीय जनतेच्या हाती द्यावी ,कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही असे ठणकावून सांगितले होते. भारतीय रिजर्व बँक ,दामोदर खोरे प्रकल्प ,हिंदू कोड बिल ,मजदूर व कामगारांच्या हिताचे निर्णय आदि धोरण त्यांच्या प्रखर राष्ट्रवादी असण्याचे प्रतिक आहेत .भारतीय परराष्ट्र धोरणाबाबत तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी काश्मीर प्रश्न , काश्मीर प्रश्नास युनो मध्ये नेण्याचे नेहरूंचे धोरण , सुवेझ कालवा , भारत-चीन संबंधा बाबत नेहरूंची भूमिका, फाळणीचे केलेले समर्थन इत्यादी बाबी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मान्य नव्हत्या . आपले संपूर्ण शिक्षण झाल्या नंतरचे संपूर्ण आयुष्य त्यांनी राष्ट्राच्या ,जनतेच्या ,समाजाच्या सार्वजनिक प्रश्नावर खर्च केले. त्यामुळे महात्मा गांधी त्यांना सच्चे देशभक्त म्हणून संबोधतात . राज्य आणि अल्पसंख्याक समाज या ग्रंथातील त्यांचे विचार म्हणजे त्यांच्या मनातील स्वतंत्र भारताची राज्यघटनाच होय. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्याची अंमलबजावणी करण्याचा आग्रह न करता आपल्या मनातील विचार बाजूला ठेऊन संविधान सभेला मान्य होणारे भारतीय संविधान तयार केले. जात ,धर्म ,भाषा,प्रांत ,प्रदेश हे राष्ट्र्वादातील प्रमुख अडथळे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते .

**निष्कर्ष :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वरील राष्ट्र , राष्ट्रीयता व राष्ट्रवादाचे विचार समजून घेतल्यानंतर असे जाणवते कि डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रखर भारतीय राष्ट्रवादी होते .त्यांचे देशावर व देशातील जनतेवर सच्चे प्रेम होते . डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वरीलप्रमाणे राष्ट्रवादाविषयीचे विचार त्यांना या देशातील गोर गरीब जनतेविषयी वाटणाऱ्या आंतरिक प्रेमातून

VOL- VIII ISSUE- IV APRIL 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

विकसित झाले. तरी त्यांना आपण दलितांचे नेते म्हणून संबोधतो हे पूर्णता चुकीचे व त्यांच्या विचाराचा आपणच पराभव केल्यासारखे आहे. त्यांचा राष्ट्रवाद हा परंपरावादी ,उग्र व हिंसक नव्हता .त्यांची राष्ट्रवादाची ,राष्ट्रीय एकात्मतेची ,राष्ट्र भक्तीची व्याप्ती राष्ट्रीय पातळीवरची होती .त्यांच्या राष्ट्र्रवादात राष्ट्रातील सर्वच लोकांना समान स्थान आहे. राष्ट्रवादाचे जुलमी ,हिंसक व आक्रमक स्वरूप मान्य नव्हते . डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद बुद्धिप्रामाण्यवादी ,पुरोगामी, शांततावादी ,संवादी व अनाक्रमी होता . शेवटी असे म्हणावे वाटते कि , डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्र हितास मारक ठरेल असे कांही केले नाही जे केले ते सर्व भारतीय समताधिष्टीत व लोकशाहीवादी राष्ट्र्रवादास रुजवणारे व पोषक ठरणारे होते . त्यामुळे वर्तमान कोविड -१९ च्या परिस्थितीत सर्व भारतीय जनता ,सरकार ,प्रशासन आदींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सर्व भारतीय जनतेत आय ऐवजी वूई ची भाषा रुजवणारा सर्वसमावेशी राष्ट्रवाद नजरेत ठेऊन त्यास आरोग्य विषयक धोरण ,निर्णय व वर्तनातून स्वंय प्रकाशित करावा .

**संदर्भ ग्रंथ:**


१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन आणि दृष्टीकोन : संपादक प्रा.सोमनाथ गुंजकर ,डॉ.शिवसांब कापसे -अनुराधा प्रकाशन ,नांदेड -२०१७

२) बाबासाहेबांचे राज्यघटनेतील योगदान - वामन निंबाळकर - दुसरी आवृत्ती - २०१३

३) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर - यदुनाथ थत्ते-कौस्तुभ प्रकाशन , नागपूर - १९९७

४) भारतीय नारी के उद्धारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर -डॉ .कुसुम मेघवाल - सम्यक प्रकाशन ,नई दिल्ली -द्वितीय संस्करण-२००५

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ - संपादन दया पवार -महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडल ,मुंबई - तृतीयावृत्ती -२००६